# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे

# ९६वे नाट्य संमेलन, ठाणे

दि. १९,२०,२१ फेब्रुवारी २०१६



संमेलनाध्यक्ष / ज्येष्ठ नाटककार

## श्री. गंगाराम गवाणकर

## अध्यक्षीय भाषण

रसिक हो,

अखिल भारतीय मराठी नाट्य सम्मेलनाची वैभवशाली परंपरा आहे, जी उभ्या जगात कुठेही दिसत नाही. या नाट्य सम्मेलनाचे पहिले-वहिले मूळ पुरुष असलेले गणेश श्रीकृष्ण उर्फ दादासाहेब खापर्डे यांना त्रिवार वंदन करुन ९६ व्या नाट्य संमेलनाचा अध्यक्ष म्हणून मी माझे मनोगत मांडत आहे.

दादासाहेब यांची निवड १९०५ च्या मुंबई मुक्कामी झालेल्या पहिल्या नाट्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानी झाली होती. तो काळ जरी पूर्णपणे वेगळा होता तरी दादासाहेबांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात जे काही म्हटले होते, तो एक भविष्यवेधच होता, असं म्हणायला हवे. ते जे काही बोलले होते ते आजही बोलले जात आहे. दादासाहेब म्हणाले होते,

"नाटक एक धंदा आहे. पण त्यात पवित्रता आहे हे विसरुन चालणार नाही, कदापि नाही. तसेच नाटक ही एक शाळा आहे. ज्या माध्यमातून रसिकांना व्यावहारिक आणि आध्यात्मिक शिक्षण मिळते आणि आयुष्याचे प्रतिबिंब म्हणजे तरी काय ? नाट्यप्रयोग. यात आपल्या अतिआवडत्या माणसांकडून गोड भाषेत शिक्षण मिळते. आनंदापासूनच नाटयकलेची खरी उत्पत्ती झाली आहे."

दादासाहेब खापर्डे म्हणाले त्याप्रमाणे आपल्या गावात पहिले-वहिले नाटय संम्मेलन भरत असल्यामुळे ठाणेकरांच्या उत्साहाला आणि आनंदाला अक्षरशः भरते आलेले आहे. ख-या अर्थाने आजपासून नाटयसंमेलनाला सुरुवात होत आहे. परंतु बारा तारखेपासूनच ठाणे नगरी रंगदेवतेच्या यात्रेकरुंचे स्वागत करण्यासाठी एखाद्या नववधूसारखी नटून - थटून तयार आहे.

केवळ दोन महिने शिल्लक असतांना ठाणेकरांना संमेलन भरविण्याचे आमंत्रण मिळाले. खरं म्हणजे सहा सहा महिने अगोदर सम्मेलनाची पूर्व तयारी करायची असते. पण कुठलेही आव्हान पेलण्याची क्षमता ठाणेकरांमध्ये असल्यामुळे हे आव्हान स्वीकारुन दैदिप्यमान, न भूतो न भविष्यती अशी तयारी

केलेली आहे. बहुतेक जगातील हे पहिले नाट्य संमेलन असेल की संमेलनाअगोदर दहा दिवस वेगवेगळे सांस्कृतिक कार्यक्रम सादर करुन मंगलमय, नाटयमय वातावरण तयार करण्यात आलंय. ठाण्याच्या आदारातिथ्या विषयी काय बोलावे ?

माझी अध्यक्षपदी निवड झाल्यापासून ठाणे गावात वेगवेगळया दहा ठिकाणी टोलेजंग सत्कार करण्यात आला ज्यात ठाण्याचे मा. महापौर मोरे साहेब आणि पालकमंत्री मा. एकनाथ शिंदे आणि मा. खासदार राजन विचारे यांचा सहभाग होता.

आता या ठाणे नगरीबद्दल

झपाट्याने बदलत आणि बहरत असलेली सांसकृतिक नगरी म्हणजे ठाणे! ठाणे शहराचे आकर्षण हे भल्याभल्यांना वाटते. त्यात मी देखील ठाणेकर प्रेमी. आज ज्या ठाणे शहरात हे नाट्यसंमेलन भरत आहे त्या जवळच दिवा परिसरात काही वर्षे मी वास्तव्याला होतो. 'वस्त्रहरण', 'वात्रट मेले' या माझ्या दोन्ही नाटकांचा जन्म हा इथलाच. तेव्हापासून या शहराशी माझं नात गच्च जुळले गेले. गेल्या पन्नास एक वर्षाच्या या परिसराच्या कायापालटाचा मी एक साक्षीदार असल्याचे भाग्य मला लाभले. आज तसा मी मुंबईकर असलो तरी या ठाण्यातच अधिक रमतो.

ही नगरी एकेकाळी "तलावांची नगरी" म्हणून ओळखली जात होती. आज तिला महाराष्ट्रातील सांस्कृतिक राजधानी अशी नवी ओळख मिळाली आहे. एका सर्वेक्षणानुसार महाराष्ट्रात सर्वाधिक तरुणांची संख्या ही इथेच आहे. पहिली रेल्वे बोरीबंदर ते ठाणे सुरु झाली त्याही पूर्वी संस्थानिकांच्या काळात इथेच नाट्यकलेला राजाश्रय मिळाला. संगीत, नाटकांच्या मैफलीही रंगल्या, वाचकांची, रसिकांची, विद्वानांची, राजकारण्यांची एक परंपराही ठाण्याला लाभली आहे. मराठी ग्रंथसंग्राहालय असो किंवा ठाणे नगर वाचनालय. न्यायमूर्ती

रानडे, लोकमान्य टिळक अशा मंडळीनी इथे भेटी दिल्या. ब्रिटिशांनी बांधलेला टाऊन हॉल, अद्यावत गडकरी रंगायतन, डॉ. काशीनाथ घाणेकर नाटयगृह, अनेक चित्रपटगृहे, शाळा क्रीडांगणे यांनी आपले देखणेपण टिकवून ठेवले आहे. एक हजार वर्षांचा मराठीचा इतिहास लिहिणारे सारस्वतकार वि. ल. भावे हे ठाणेकर असल्याचा सा-यांनाच सार्थ अभिमान आहे. अनेक शिक्षणसंस्था हे तर ठाण्याचे वैभवच म्हणावे लागेल. या नगरीत ठाण्याची शान असलेल्या दादोजी कोंडदेव मैदानात हे नाट्यसंमेलन भरत आहे हे भाग्यच. खरंतर ठाण्याचे वर्णन करायचे म्हटले तर एखादा महाग्रंथ सहज होईल. अशा या ठाणे नगरीत भरलेल्या पहिल्या नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदी माझी निवड झाली. हे माझे परमभाग्यच!

नाटयसंमेलनाध्यक्षांच्या या सिंहासनावर विराजमान झालेल्या रंगदेवतेच्या महान्-मंगल गाभा-यातील पुजा-यांची नामावली वाचली तर मती कुंठीत होते. त्या महापुरुषांची उंची आपली नाही आणि गाठूही शकणार नाही याची मनोमन खात्री आहे. पण ज्या सिंहासनावर बसण्याची संधी मिळतेय त्या सिंहासनाचे पावित्र्य राखण्याचा माझ्याकडून आटोकाट प्रयत्न केला जाईल. नाटयसंमेलनाच्या अध्यक्षपदाचा कालावधी फक्त एका वर्षा पुरता मर्यादित आहे.या एका वर्षात काय करु शकतो ? असा प्रश्न उपस्थित केला जातो. पण मनात आणलं आणि निश्चय केला तर अनेक गोष्टी करता येतील. त्यासाठी रंगभूमीच्या घटक पक्षांशी सतत संपर्कात राहणे नितांत गरजेचे आहेच, शिवाय त्यांच्या गरजा जाणून घेऊन त्यांचे निराकारण कसे काय करता येईल याचा पाठपुरावा करणे महत्वाचे आहे.

त्याची सुरुवात **बालरंगभूमी** पासूनच करायला हवी. कारण बालरंगभूमी हा रंगभूमीचा मूळ पाया आहे. रंगभूमीच्या इतिहासात २०१५ साली अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेने नाट्यसृष्टीला एक गोड धक्का दिला. सिध्देश्वराचे पवित्र स्थान असलेल्या आणि साहित्य नाट्य चळवळीशी एकनिष्ठ असलेल्या सोलापूर नगरीत पहिल्या-वहिल्या बालनाटय संमेलनाचे आयोजन

केले गेले. आणि विशेष म्हणजे या बालनाटय संमेलनाच्या अध्यक्ष पदाचा मान गेली बत्तीस वर्ष अपंगांची नाट्य चळवळ सातत्याने चालविणा-या नाट्यशालाच्या सौ. कांचन कमलाकर सोनटक्के यांना देण्यात आला. रंगभूमीच्या वृध्दीसाठी आपण काहीतरी ठोस पावलं उचलीत आहोत हे नाटयपरिषदेने या कृतीने सिध्द करुन दाखवले. या बालनाट्य सम्मेलनामुळे बालरंगभूमीशी रक्ताचं नातं असलेल्या अनेक दिग्गजांच्या कार्याची माहिती तर मिळालीच आणि त्यांचे मौलिक विचारही ऐकायला मिळाले. शहरांपासून दूरवरच्या खेडया-पाड्यात पोटतिडकीने बालरंगभूमीसाठी धडपडणारे हे रंगकर्मी, रंगभूमी समृध्द करण्यासाठी नक्कीच हातभार लावतील यात शंका नाही.

एखाद्या कुटुंबात जेव्हा एकादं मूल अपंग असतं तेव्हा ते अख्खं कुटुंबच कोसळून पडतं. अशा कोसळणा-या कुटुंबातील मुलांना मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या उभे करण्यासाठी बत्तीस वर्षे सातत्याने काम करीत रहाणे हे खरोखरच कौतुकाचे आणि धाडसाचे काम आहे. सौ. कांचनताई सोनटक्के यांच्या या कार्याचा गौरव करण्यासाठी त्यांना पद्मश्रीच बहाल करायला हवी.

बालरंगभूमी बाळसेदार होण्यासाठी पहिल्या इयत्तेपासूनच नाट्यविषय हा समाविष्ट करुन घ्यायला हवा. कारण बालमन हे टिप कागदासारखं असतं. या वयातच त्यांच्यावर संस्कार घडवून आणले तर पहिल्यापासूनच त्यांच्यात सभाधीटपणा आणि रंगमंचाचा सरावही होईल. अर्थातच यातील सगळेच विद्यार्थी रंगमंचाकडे वळतील अशातला भाग नाही. पण या मुलांमधून कुणी डॉक्टर, इंजिनीयर, शिक्षक अगदी राजकीय नेता जरी झाला तरी संभाषण चातुर्याचं बाळकडू त्यांना पाजता येईल.

मुलांना नाट्यविषय शिकविण्यासाठी शाळेतील शिक्षकांनाच नाट्यविषयाचे शिक्षण देणे गरजेचे आहे. त्यासाठी मुळातच नाट्यगुण अंगी असणाऱ्या शिक्षकांना, ज्येष्ठ रंगकर्मी आणि विद्यापिठातून नाट्य शिक्षण पूर्ण करुन आलेल्या शिक्षकांकडून शिक्षण देणं महत्वाचे आहे. शिवदास घोडके,

कुमार सोहोनी, अभिराम भडकमकर, चंद्रकांत कुलकर्णी, गौरी केंद्रे, प्रशांत दामले, विद्या पटवर्धन, कांचन सोनटक्के, रोहिणी हट्टंगडी, अशोक सावंत अशा रंगभूमीशी जवळचं नातं असलेल्या जाणकारांचा सल्ला घेतल्यास ते नक्कीच हितकारक ठरेल. नाट्यलेखन सुध्दा शिक्षकांनीच करायला हवं. कारण मुलांची मनं फक्त शिक्षकच जाणतो. बालरंगभूमी जर समृध्द झाली तर आजवर बालरंगभूमीसाठी बहुमोल योगदान देणाऱ्या नयना आपटे, सुधा करमरकर, सुलभा देशपांडे, अरुणकाका काकडे, वंदना विटणकर, अशोक सावंत, डॉ. कृ.रा. सावंत, नरेंद्र बल्लाळ, श्रीरंग गोडबोले आणि जेष्ठ साहित्यिक नाटककार रत्नाकर मतकरी यांना मानवंदना दिल्यासारखी होईल. रत्नाकर मतकरीचं तर खास कौतुक कारायला हवं. कारण ते ठाण्याच्या झोपडपट्टीतील गरीब मुलांना एकत्र करुन त्यांच्याकडून नाट्यकलेचे धडे गिरवून घेत आहेत. आपल्या 'बालनाटय' या संस्थेतर्फे झोपडपट्टीतील एक तरी कलावंत देशपातळीवर नावारुपाला आणायचाच, असा सुप्रिया मतकरी, प्रतिभा मतकरी आणि रत्नाकर मतकरी यांनी विडाच उचललाय. त्यांच्या या सत्कार्याला लाख लाख शुभेच्छा !

आज बालरंगभूमी आणि व्यावसायिक रंगभूमी यांचा विचार केला तर प्रयोगिक रंगभूमी अधिक सक्षम होत असल्याचं जाणवतेय. त्याला कारण महाराष्ट्र राज्य गेली पच्चावन्न वर्षे राज्य स्तरावर घेत असलेल्या नाट्यस्पर्धा. इतक्या सातत्याने अखंडपणे प्रदीर्घकाळ, नाट्यस्पर्धेचे व्यवस्थितपणे आयोजन करणारे महाराष्ट्र राज्य हे जगातील एकमेव राज्य असावं. या राज्य नाट्यस्पर्धेत मराठी रंगभूमीला प्रतिभासंपन्न लेखक, दिग्दर्शक, तंत्रज्ञ दिले. त्याचा फार मोठा फायदा व्यावसायिक रंगभूमीला झाला. महाराष्ट्र शासनाने सांस्कृतिक खात्याचा कारभार नाट्य अभ्यासूवृतीच्या आणि कलेची जाण असणा-या अधिका-यांच्या हातात सोपवल्यामुळे एकेकाळच्या नाटयस्पर्धेतील जाणकार रंगकर्मीना राज्य नाट्य स्पर्धेचे परीक्षक म्हणून नेमणूक करण्यात येते. व्यावसायिक नाट्यस्पर्धेचे आयोजन केल्यामुळे दर्जेदार नाटयनिर्मिती करण्याकडे नाट्य व्यावसायिकांमध्ये

चढाओढ सुरु झाली आणि त्यातून चांगल्या नाटकांचा प्रेक्षकांना आस्वाद घेता आला.

अलिकडच्या काळात **एकांकिका स्पर्धांना** चांगले सुगीचे दिवस प्राप्त झालेत. राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा तर गावोगावी होताहेत. या प्रायोगिक रंगमंचावर नंबरात आलेल्या एकांकिकांचे राज्यभर प्रयोग करण्याचे धाडस तरुण कलावंत करताहेत. एकप्रकारे ही व्यावसायिकतेकडे वळण्याची पावले आहेत. आपल्या रायगड जिल्ह्यात पालीसारख्या ठिकाणी प्रकाश देसाई सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठान तर्फे एकाचवेळी पस्तीस एकांकिकांचे आयोजन करतात. गेली आठ वर्षे इथे एकांकिकांचा अक्षरशः उरुस भरवला जातो. पहिल्या नंबरचे बक्षिस ५० हजारापर्यंत असल्यामुळे स्पर्धकांमध्ये सुध्दा कमालीची चुरस असते. एकाचवेळी हजाराच्यावर प्रेक्षक हजेरी लावतात. खऱ्या अर्थाने प्रकाश देसाई यांनी नाटक पाहण्याचं प्रेक्षकांना व्यसन लावलंय ! प्रेक्षकांना व्यसन लावणारे असे जर लोकप्रतिनिधी पुढे सरसावले तर रंगभूमीला खरोखरच चांगले दिवस प्राप्त होतील.

पूर्वीच्या काळात संस्थानिक / राजे कलावंताना राजाश्रय द्यायचे. १८४३ साली झालेल्या 'सीता स्वयंवर' या विष्णूदास भावे यांच्या नाटकाच्या पहिल्या प्रयोगाला राजाश्रय लाभला. त्याच धर्तीवर लोकप्रतिनिधींनी भरघोस रकमेच्या बक्षिसांच्या नाट्यस्पर्धा भरवाव्यात. आयपीएलच्या पध्दतीने लोकप्रतिनिधींमध्येच नाट्यस्पर्धा व्हावी. पहिल्या क्रमांकावर आलेलं नाटक हे खासदार महाशयांनी दत्तक घ्यावे, आणि त्या नाटकाचे महाराष्ट्रभर प्रयोग करावेत. होईल काय तर सुजाण प्रेक्षकांइतकाच सुजाण मतदारही तयार होईल. आजच्या नाटक या धंद्याला, जे दूरदर्शनच्या पडद्याचं ग्रहण लागलंय ते दूर करण्यासाठी लोक प्रतिनिधींनीच पुढाकार घ्यायला हवा. त्यासाठी लोकप्रतिनिधींना त्यांच्या मतदार संघात सुधारणा करण्यासाठी मिळणारे अनुदान, त्यातील काही अंशी रक्कम ही आम्हा रंगकर्मीसाठी बाजूला काढून ठेवावी. कलेची बूज ठेवणाऱ्या

लोकप्रतिनिधींना जनमानसात चांगलाच मानसन्मान मिळतो. या गोष्टीचा अवश्य विचार करावा. लोकप्रतिनिधींकडे कार्यकर्त्यांची एक मोठी फळी असते. त्या कार्यकर्त्यांचा अशा नाट्य उपक्रमात उपयोग करुन घेता येईल.

लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरु करुन महाराष्ट्रावर अनंत उपकार करुन ठेवले आहेत. धार्मिक कार्यातून सामाजिक प्रबोधन व्हावं हाच त्यांचा उद्देश. हजारो कलावंतांना सार्वजनिक गणेशोत्सवाचा रंगमंच उपलब्ध झाल्यामुळे आपल्या कलागुणांचा आविष्कार सादर करता आला. आजच्या घडीला असा एकही कलावंत नसेल ज्याने गणेशोत्सव मंडळात आपल्या तोंडाला रंग लावला नाही. लोकप्रतिनिधींनी लोकमान्य टिळकांचा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून आमच्या रंगकर्मीकडे पहावे. एकेकट्याला सिलेब्रिटी म्हणून बोलावून मानधन देण्यापेक्षा रंगभूमीच्या भल्यासाठी सर्वजण एकत्र कसे येतील याचा विचार करावा.

**कीर्तनकार** हा एकपात्री प्रयोगामागचा आद्यप्रवर्तक. कीर्तनकार हा मुख्यत्वे रामायण व महाभारत किंवा पौराणिक कथांवर आधारित कीर्तनाची आखणी करीत असतो. हातात झांज व चिपळया आणि साथीला पेटी तबल्याची साथ घेऊन श्रोत्यांनाही सहभागी करुन कीर्तनात मग्न करीत असतो. एकपात्री प्रयोग कसा करायचा याचा अभ्यास करायचा असेल तर कीर्तनाचा अभ्यास करायला हवा. कीर्तनकार हा उत्तम अभिनेता असावा लागतो. मी माझ्या लहानपणी आमच्याच 'माडबन' गावच्या शेजारी असलेल्या जानशी गावातील शंकरभाऊ पटवर्धन यांचे कीर्तन तन्मयतेने ऐकायचो. आमच्या पंचक्रोशीत शंकरभाऊंचं कीर्तन कुठेही असो गावागावातून झुंडीच्या झुंडी त्यांचे कीर्तन ऐकायला जमायचे. महाभारत व रामायण यांचा सखोल अभ्यास असल्यामुळे ते कीर्तनात श्रोत्यांना गुंतवून ठेवायचे. तिरकस विनोदाने हसवता-हसवता सुरेख प्रबोधन करायचे. त्यावेळी महाराष्ट्र शासनाने कुटुंब नियोजनावर प्रबोधन करण्यासाठी त्यांची अधिकृत कीर्तनकार म्हणून नेमणूक केली होती. मामलेदार

/कलेक्टर तन्मयतेने त्यांची कीर्तने ऐकत बसायचे. माझ्या बालमनावर त्यांच्या कीर्तनाचा प्रभाव पडला म्हणूनच माझ्यातील नाट्यगूणांना वाव मिळाला. शंकरराव पटवर्धन हे महाभारताचे गाडे अभ्यासक राजा पटवर्धन यांचे तीर्थरुप. गोवा कला अकादमीत दरवर्षी कीर्तनकारांची मोठ्याप्रमाणात स्पर्धा घेतली जाते. तशी महाराष्ट्रातही घेतली जावी, असं मला मनापासून वाटत. कीर्तनकार हा सर्वस्पर्शी विद्यापीठ आहे. त्याचा शासनाने आदर करावा ही अपेक्षा.

आता **माझ्या काही नाटकांबद्दल.** व्यावसायिक रंगभूमीवर माझी एकूण सोळा नाटकं आली. निर्मात्यांच्या आकडेवारीनुसार "वस्त्रहरणाचे" ५४०० प्रयोग झाले (ओम नाट्यगंधा- मनोहर नरे, भद्रकाली प्राडक्शन-मच्छिंद्र कांबळी) 'वात्रट मेले' २५०० प्रयोग (प्राची थिएटर्स-रणजीत मसुरेकर) 'वन रुम किचन' १००० प्रयोग (एकूण चार निर्माते) १) शैलेश सावंत २) कलावैभव (मोहन तोंडवळकर) ३) 'गणरंग' (विनय आपटे) ४) सुप्रिया प्रॉडक्शन (गोविंद चव्हाण) 'दोघी' (१९७३ ते १९८०) २०० प्रयोग (अनंत शिंदे-देवेंद्र परब) १६ नाटकांपैकी या ४ नाटकांनी नाटककार म्हणून मला ओळख दिली. १२ नाटकांपैकी काही गाजली. पण रंगभूमीच्या प्रवाहात मला ठेवलं. थोडसं आपटलं धोपटलं पण जखमांची जाणीव होऊ दिली नाही. वारंवार मिळणाऱ्या पुरस्कारांनी आणि अधून मधून होणाऱ्या सत्कार समारंभात मिळणाऱ्या शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छांनी आनंदित ठेवले.

मालवणी भाषेतील 'वस्त्रहरण' नाटकामुळेच मला या खुर्चीचा मान मिळाला हे मला नम्रपणे मान्य करावेच लागेल आणि मोजक्याच शब्दात आपल्याला त्रास झाला तरी 'वस्त्रहरण' ची कूळकथा ऐकावी लागेल.

पहिल्यांदा व्यावसायिक रंगभूमीवर, तिथे जम न बसल्यामुळे गिरणी आणि कामगार कल्याण स्पर्धा, तिथे यश मिळाल्यानंतर मग व्यावसायिक रंगमंचावर, असा 'वस्त्रहरण' चा रंगमंचावर तिहेरी प्रवास झालेला आहे. व्यावसायिक रंगमंचावर या नाटकाचा पहिला प्रयोग ६ नोव्हेंबर १९७५ आणि ८ नोव्हेंबर

१९७५ साली रवींद्र नाट्य मंदिरात पार पडला. काजल थिएटर्सचे निर्माते छबील वसाणी आणि मी स्वतः असे दोन निर्माते होतो. मॅनेजर होते गोटया सावंत आणि त्याचा मोठाभाऊ प्रभाकर सावंत. पात्र परिचय असा-सरपंच-राजा मयेकर, मास्तर-मधु कडू, गोप्या-मधू आपटे, धर्म-व्यंकटेश विचारे, पहिला राक्षस आणि दुःशासन मच्छिंद्र कांबळी, दुसरा राक्षस-कल्याण मांजरेकर, मंजुळाबाई-संजीवनी बिडकर, द्रौपदी काकू- सुलोचना मोंडकर, दिग्दर्शक-राजा मयेकर. नाटकातलं नाटक न कळल्यामुळे ते दोनच प्रयोगात थांबले. परंतु विश्‍वनाथ मोरेचं संगीत आणि राधा धारेश्वरांनी गायिलेली लावणी रसिकांच्या मनावर नाटकाएवढीच मोहिनी करुन गेली. शिवाय मालवणी भाषा.

१९७७ साली कै. रमेश रणदिवे या दिग्दर्शकाने मुंबईतील गिरणी नाट्य स्पर्धेत 'वस्त्रहरण' व्हिक्टोरीया मिलतर्फे केले. संपूर्ण मुंबईत या नाटकाने प्रथम क्रमांक मिळविला. मधुकर धाडुसकर या नटाला अभिनयाचं रौप्यपदक मिळालं. यात मास्तरची भूमिका करणारा सुभाष ढवण व्यावसायिक 'वस्त्रहरणात' शेवट पर्यंत भूमिका करीत राहिला.

१९७८ साली विनायक चासकरांनी दूरदर्शनवर 'वस्त्रहरणचं' दर्शन घडविलं. त्यातही राजा मयेकर सरपंच आणि गोप्याच्या भूमिकेत रमेश रणदिवे होते. प्रेक्षकात ८/९ वर्षाची उर्मिला मातोंडकर बसलेली होती. त्या चिमुरडीचं गोजीरवाणं रुप पाहून विनायक चासकर म्हणाले होते की ही जागतिक कीर्तीची अभिनेत्री होणार आणि तसंच झालं. 'वस्त्रहरण' नाटक दूरदर्शनवर पाहिल्यावर चित्रपती व्ही. शांताराम आणि साहित्यसम्राट पुं. ल. देशपांडेंनी या नाटकाचं पुन्हा प्रक्षेपण करा अशी दूरदर्शनला विनंती केली होती आणि ती त्यांनी मान्य केली.

त्यानंतर १९७९ साली झालेल्या कामगार कल्याणच्या स्पर्धेत २६९ नाटकात वस्त्रहरण पहिल्या क्रमांकाने आले. या स्पर्धेत देखील पांडुतात्या सरपंचाची भूमिका करणाऱ्या मधुकर धारुसकरला अभिनयाचे रौप्यपदक मिळाल. ही नाट्य संस्था मच्छिंद्र कांबळीच्या रेवंडी गावाशी निगडित होती.

व्यावसायिक रंगमंचावर १९७५ साली पदार्पण करणाऱ्या 'वस्त्रहरणने' गिरणी कामगार स्पर्धा, कामगार कल्याण नाट्यस्पर्धा गाजविल्या. मालवणी भाषेवर आणि कलावंतांवर मनापासून प्रेम करणाऱ्या ट्रेड युनियनचे आणि छत्रपती शिवाजी मंदिरचे चिटणीस मनोहर नरे यांनी राष्ट्रीय मिल संघाच्या रंगमंचावर 'वस्त्रहरण' नाटकाचा मुहूर्त माझ्या हस्ते केला. पांडुतात्या सरपंचाची वस्त्रे मच्छिंद्र कांबळींच्या अंगावर चढविली. परंतु शुभारंभाच्या, म्हणजे १५ फेब्रुवारी, १९८० च्या प्रयोगाला मच्छिंद्र कांबळी उपलब्ध नसल्यामुळे मला स्वतःला पांडुतात्या करावा लागला. दुसऱ्या दिवशी १६ फेब्रुवारी १९८० दुपारी चार वाजता चौऱ्यांशी वर्षांनी आलेलं सूर्यग्रहण होतं. निर्माते मनोहर नरेंनी पांडुतात्या सरपंचाची वस्त्रे माझ्या अंगावरुन काढून ती मच्छिंद्र कांबळींच्या अंगावर चढविली. असा हा अमावस्या ते सूर्यग्रहण प्रवास, जो मच्छिंद्र कांबळीला फलद्रुप, झाला.

साठ प्रयोगापर्यंत ६० हजाराच्या तोट्यात असतानाही नरेंनी हे नाटक चालविले. आमच्या सगळ्यांच्या नशिबाने 'पु. ल. भाईंचा' वस्त्रहरणाला परिसस्पर्श झाला. नाटक धो धो चालायला लागले. १९८२ साली मच्छिंद्रने स्वतःची 'भद्रकाली प्रॉडक्शन' संस्था सुरु केली आणि ६०० प्रयोगानंतर 'वस्त्रहरण' मच्छिंद्रांच्या ताब्यात देण्याची नरेंनी परवानगी दिली.

मालवणी भाषेवर, मातीवर मच्छिंद्रचं मनस्वी प्रेम होतं. आपली भाषा सातासमुद्रापलिकडे जावी असं त्यांचं स्वप्न होतं. स्वप्न रंगवून वास्तवात आणणारा मच्छिंद्र हा माझा जिगरबाज मित्र होता. १९८३ साली त्याच्या जिगरबाजापणामुळेच मालवणी भाषा लालडब्याच्या एसटीतून बाहेर पडून सिंगापूर एअरलाईन्सच्या विमानात जाऊन बसली आणि त्या मालवणी बोली भाषेने ब्रिटीश रंगमंचावर पदार्पण केले. मी केवळ निमित्तमात्र आहे. १९७५ साली छबील वसानी सारखा गुजराती निर्माता मालवणी नाटक करायला पुढे सरसावला. नंतर गिरणी आणि कामगार स्पर्धेत पहिलं नाटक येऊनही एकाही निर्मात्याने व्यावसायिक रंगमंचावर आणण्याचं धाडस केलं नाहीचं. उलट 'कसलाता मालवनी रोंबाट'

असे शेरे मारले. पण याच नाटकाने मराठी रंगभूमीला मच्छिंद्र कांबळीसारखा तगडा नट, निर्माता दिला आणि माझ्यासारख्या एकवेळ फुटपाथवर आयुष्य काढणाऱ्या एका बिगाऱ्याला अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या खुर्चीवर बसण्याचा मान मिळाला. एका बोली भाषेतील नाटकाने उत्पन्नांचे सगळे विक्रम तर मोडलेच, पण गेली ४० वर्षे 'वस्त्रहरण' होतं तसंच ताजंतवानं राहिलं आहे. अनेक दिग्गज नटांना या नाटकात भूमिका करावीशी वाटते. मालवणी भाषेला 'वस्त्रहरण' ने मानाचे स्थान दिले. मालवणी जत्रौत्सव सुरु होऊन मालवणी पदार्थांना एक बाजारपेठ मिळवून दिली. एका बोलीभाषेने केलेला हा केवढा मोठा चमत्कार आहे. हे श्रेय जाते या नाटकातील सर्व कलावंतांना आणि निर्मात्यांनांही. आज नाटकवाल्यांच्या या मंडपात महाराष्ट्राच्या कोना-कोपऱ्यातून आणि महाराष्ट्राबाहेरुनही अनेक रंगकर्मी आपल्या बोलीभाषेचा सुगंध सोबत घेऊन आलेले आहेत. 'वस्त्रहरण' सारख्या आपल्याही बोली भाषेतील एखाद्या कलाकृतीने या मांडवात पाऊल ठेवावं अशी त्यांची इच्छा असणारच! का असू नये ? कारण बोली भाषा हीच खरी ह्रदयाची भाषा आहे.

अध्यक्ष या नात्याने महाराष्ट्र शासनाला आणि नाट्य परिषदेला मला कळकळीची विनंती करावीशी वाटते की, त्यांनी विविध बोलीभाषेतील लेखकांना त्यांच्या बोलीभाषेतील नाटक लिहायला भाग पाडून वर्षभराच्या आत बोलीभाषेतील नाटकांच्या स्पर्धेचं आयोजन करावं. त्याचं पालकत्व नाटयपरीषदेने घ्यावे आणि महाराष्ट्रभरात प्रयोग करावेत. कमीत कमी वर्षभरात पाच बोलीभाषेतील लेखक तयार व्हावेत असे मला मनापासून वाटते.

**लोकरंगभूमी** आणि नागर रंगभूमी यांचे आदान प्रदान १९व्या शतकाच्या मध्यापासून सुरु आहे. 'वद जाऊ कुणाला शरण' हे संगीत नाटकातले पद आणि 'नेसले पितांबर जरी ग' एक नाट्यगीत, तर दुसरी लावणी जरी असली तरी या दोघांची चाल एकच आहे. मराठीतील बोलींचे लोकसंस्कृतीशी अतुट नाते आहे. या बोलीभाषेवर आधारित नाटकंही रंगभूमीवर आली. १९७८ साली इंडियन नॅशनल थिएटर लोककला संशोधन केंद्राची स्थापना झाली. वगसम्राट दादू

इंदूरकर यांनी त्याचे उद्घाटन केले. संशोधन केंद्राचे संचालकपद अशोकजी परांजपे यांनी सांभाळले. अबक-दुबक, खंडोबाचे लगीन, दशावतारी राजा, जांभुळ आख्यान वासुदेव सांगाती अशा संशोधनपर नाटकांची मालिकाच रंगभूमीवर आली. अशोकजी परांजपे यांच्यासोबत डॉ. प्रकाश खांडके, डॉ. तुळशी बेहरे, गणेश हाके, डॉ. रमेश कुबल, सुरेश चिखले यांचेही मोलाचे योगदान आहे. मुंबई विद्यापिठाच्या लोककला अकादमीचे प्रा. डॉ. प्रकाश खांडके यांनी लोककलावंतांना नागर रंगमंच प्राप्त करुन दिला. कोकणातील 'दशावतार', विदर्भातील 'खडी गम्मत', पश्चिम महाराष्ट्रातील लावणी, पोवाडा, तमाशा, भारुड यासारख्या लोककलेंच्या संशोधनाचे काम झाले. शाहीर साबळे, विठ्ठल उमप, राजा मयेकर, सुहास भालेकर यांच्या एकूणच सादरीकरणामागच्या प्रेरणा या लोकरंगभूमीच्याच आहेत. मराठी व्यावसायिक रंगभूमीस या लोकरंगभूमीचे योगदान मान्य करावेच लागेल. 'वस्त्रहरण' नंतर सुंदर तळाशिलकर (चाकरमानी), श्री. मधु मंगेश कर्णिक (केला तुका झाला माका), प्र. ल. मयेकर (पांडगो ईलो रे बा ईलो), रमेश पवार (घास रे रामा), संतोष पवार (यदा कदाचित), प्रविण शांताराम (येवा कोकण आपलाच आसा), मोहन भोईर (मांडवाचे मगारी चाललाय काय- आगरी) रांगोळीकार व नाटककार गुणवंत मांजरेकर (रोंबाट) तसेच के. राघवकुमार, जनार्दन परब, दिग्दर्शक रघुवीर कदम, नेपथ्यकार अंकुश कांबळी व सुनील देवळेकर यांचे कोकणातील वास्तवता दाखविणारे कल्पक नेपथ्य आणि दशावतारी मंडळे जी मालवणी भाषेची वैभव व संस्कृती जपणारी आहेत, या साऱ्यांनी बोलीभाषेला प्रतिष्ठा मिळवून दिली.

या नाटककारांनी बोलीभाषेतील नाटक लिहून रंगभूमीवर अनंत उपकार केलेले आहेत. बोलीभाषेतील नाट्य लेखकांनी त्यांचंच अनुकरण करावं असं मला वाटतं. वस्त्रहरणाने तर आणखी मोठा पराक्रम केलेला आहे. तो म्हणजे 'वस्त्रहरण' येण्याच्या अगोदर 'हीट ॲन्ड हॉट' नाटकाची लाट सुरु होती. 'वस्त्रहरण'ने ही लाट रोखून धरली. चोख प्रत्युत्तर दिले.

एकेकाळी सुवर्णयुग असलेल्या **संगीत रंगभूमीचे** चित्र अत्यंत

निराशाजनक आहे. शासनाकडून संगीत नाटकांची स्पर्धा होते. त्यात जुनीच नाटकं सादर केली जातात. नवीन असं काही सापडतच नाही. गाणारे सुरेल गळे नक्कीच आहेत. पण ते तेवढा वेळ देऊ शकत नाहीत. कारण अर्थार्जन हा महत्वाचा भाग आहे. दिवाळी पहाटेला जुनी गाणी ऐकणे आणि दुधाची तहान ताकावर भागवणे एवढंच काय ते समाधान. एखाद्या गाण्याच्या मैफलीत किंवा दिगंबर प्रभुंच्या आयोजनात कधी तरी जुन्या नाटकातील नाट्यगीते कानावर पडतात तेव्हा कान तृप्त होतात आणि वाटतं, गात्या गळ्यांनी तो सुवर्णकाळ पुन्हा रंगमंचावर आणायला हवा. पण वेळ आणि अर्थकारण यांचा मेळ घालणं कठीण असल्यामुळे तो मौल्यवान 'ऐवज' फक्त जपून ठेवणे या पलीकडे आपण काहीही करु शकत नाही. कारण आता फास्टफूडचा जमाना आलाय. याही परिस्थितीत पुण्याची भरतनाट्य संशोधन मंदिर आणि पुण्याची नाटय परिषद शाखा श्रध्देने संगीत नाटकांचे मोजकेच का होईना पण, प्रयोग करते. ही कौतुकाची बाब आहे. 'जे जुनं ते जपून ठेवणं !' ही तर पुणेकरांची खासियत आहे.

संगीत रंगभूमीने एक सुवर्णकाळ साकार केला. ललितकलादर्श, मराठी रंगभूमी, रंगशारदा, नाट्यमंदिर या संस्थांनी संगीत रंगभूमीचा वसा पुढे पोहोचविण्याचा प्रयत्न जरुर केला. बदलत्या काळात संगीत रंगभूमीवर काही नवे प्रयोग करण्याचे आव्हान आज नव्या रंगकर्मींपुढे आहे. विद्याधर गोखले यांचे 'सुवर्णतुला', 'स्वरसम्राज्ञी', पुरुषोत्तम दारव्हेकरांचे 'कटयार काळजात घुसली', वसंत कानेटकरांची 'मस्त्यगंधा', 'लेकुरे उदंड झाली' अशा दर्जेदार संगीत नाटकांचे पुनरुज्जीवन केल्यास एक सुवर्णकाळ जागा होईल. नृत्य, नाटय, संगीत, नेपथ्य, संहिता यांच्या भूतकाळातल्या संकल्पना या काळानुरुप बदलल्या पाहिजेत. त्यात नाविन्य हवे आणि हा बदल रसिकांनाही पचनी पडायला हवा. तसे झाले तर पुन्हा संगीत रंगभूमीला चांगले दिवस येतील. नाटक ही एक सामुहिक कला आहे, हे देखील विसरता कामा नये.

जे नैराश्य संगीत रंगभूमीच्या बाबतीत जाणवतय ते काही अंशी

**भाषांतरित** आणि **रुपांतरित** नाटकांच्या बाबतीत होत आहे. परकीय कल्पनेवर आधारित जे नाटकांना महत्त्व मिळायला हवं तेवढं दिलं जात नाही. स्पर्धांमध्ये आणि पुस्तकांच्या बाबतीत अशा नाटकांचा विचारच केला जात नाही. खरं म्हणजे अखंड विश्वाची जडण-घडण ही देवाण-घेवाण यावर चालते. जागतिक रंगभूमीचा विचार केला तर परदेशी रंगमंचावर काय चाललंय हे आपल्याला कळायला हवं. आपल्या रंगभूमीवर आपण कुठले नवीन प्रयोग आणि विचार मांडतोय हे तिथपर्यंत पोहचायला हवं. याला पर्याय एकच आदान-प्रदान. काही लेखक मोठ्या उत्साहाने ही जबाबदारी उचलताहेत. परंतु अशा लेखनाला स्पर्धेत आणि पुस्तकातून डावलंल गेल तर त्यांच्या पदरी नैराश्यच येईल, हे टाळायला हवं. भाषातंरित व रुपांतरित नाटकांसाठी विशेष प्रयत्न करायला हवेत. आपल्या मराठी रंगभूमीवर भारतीय रंगभूमीच्या गाजलेल्या नाटकांची भाषांतरे व रुपांतरे इंग्रजी आणि इतर भाषांमध्ये होऊन ती नाटकेही जागतिक पातळीवर पोहचायला हवीत.

'नाट्यमन्वंतर' 'रंगायतन' आणि त्यानंतर 'रुपवेध', 'आविष्कार' सारख्या नाट्य संस्थांनी रुपांतरित नाटकांची ओळख मराठी रंगभूमीला करुन दिली होती. या नाटकांनी मराठी रंगभूमीला नवी दिशा दिली, दृष्टी दिली. नव्या आशयांची, नव्या जाणिवांची नाटके त्यानंतरच रंगभूमीवर येऊ लागली. कौटुंबिक समस्यांमध्ये दिवाणखान्यात घडणाऱ्या नाटकांना शह देऊन नव्या आशय-विषय शैलीची नाटकं रंगभूमीवर स्थिरावली.

या नव्या जाणिवांच्या नाटकांना रसिकाश्रय लाभला. कारण त्यातली प्रायोगिकता हौशी रंगभूमीची चळवळ, रंगायतनच्या विभाजनातून आविष्कार सारखी नाट्यसंस्था आणि तिच्या पुढाकाराने सुरु झालेली 'छबिलदास' चळवळ ही एक महत्वाची घटना ठरली. केवळ नाट्यसंहिताच नव्हे तर सादरीकरण, इतर तांत्रिक अंगं, अभिनयाच्या शैली, दिग्दर्शनातील अनेक प्रयोग हे छबिलदासच्या चळवळीमुळे रसिकांपुढे आले. या चळवळीने रसिकांच्या जाणिवा विस्तृत झाल्या.

त्यांना रंगभूमीच्या नव्या शक्यता, परिणामांची अनुभूती मिळाली. व्यावसायिक नाटकांसाठी मिळणारा प्रेक्षकही प्रगल्भ झाला.

मात्र छबिलदास रंगमंच आविष्काराला दुरावल्यानंतर ही चळवळही थंडावली. आविष्कार चळवळ, ही माजी नाट्यसंमेलनाध्यक्ष अरुणकाका काकडे यांच्या खांद्यावर स्थिरावली आहे. काकडेकाका एकांड्या शिलेदाराप्रमाणे ही चळवळ पुढे रेटण्याचा आटोकोट प्रयत्न करताहेत. वयाच्या ८४ व्या वर्षी सुध्दा काकडेकाका धावपळ करीत असतात. त्यांच्यापासून तरुण रंगकर्मींनी धडा घ्यायला हवा. कधी-कधी माणूस म्हणजेच एक संस्था असते. काकडेकाका प्रमाणेच अशोक मुळे ही एक चालती बोलती नाट्य संस्था आहे. नाट्यसृष्टीत 'पांढरे मुळे' म्हणून यांची ओळख आहे. नाट्य व्यवस्थापनाबरोबरच नाट्यसृष्टीतील रंगकर्मींना एकत्रित आणणे त्यांचा छंद. 'माझा पुरस्कार' ही संकल्पना त्यांचीच. रंगकर्मी एकत्रित आणणे, त्यांना सुग्रास जेवण देणे आणि जेवणासोबत न ठरलेले आयत्यावेळी मनोरंजनात्मक भाषण करणे आणि रंजल्या गांजलेल्यांना मदत करणे ही त्यांची खासियत. या चालत्या-बोलत्या पांढऱ्या शुभ्र संस्थेला वेळोवेळी कार्यक्रम सादर करण्यासाठी गुप्तधनाचा झरा कुठून येतो हा एक संशोधनाचा विषय ठरावा.

**एकपात्री प्रयोगांबद्दल** - अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेने खरोखरच काही निर्णय दूरदृष्टी ठेवून घेतले आहेत. २००६ साली नांदेड येथे भरलेल्या नाट्य संमेलनात नाट्यपरिषदेने एकपात्री प्रयोग करणाऱ्या कलावंतांला संमेलनात स्वतःचे व्यासपीठ तर मिळवून दिलंच शिवाय वर्षातून एका कलावंतांला संमेलनातच पुरस्कार देऊन गौरवण्याचा निर्णय घेतला. अण्णा पिळणकर, रणजित बुधकर, साहित्यसम्राट पु. ल. देशपांडे, सदानंद जोशी, सुहासिनी मुळगांवकर, लक्ष्मण देशपांडे या दिग्गज एकपात्री कलावंताना मानवंदनाच दिली आहे. एकपात्री प्रयोग करणाऱ्या कलावंताना पुरस्कार देऊन नाट्य संमेलनात गौरव केल्यामुळे काही एकपात्री कलावंत एकत्रित आले आणि त्यांनी स्वतःची एक

नाट्य संस्था स्थापन केली. या संस्थेतर्फे दोन अंकी विनोदी नाटकच रंगमंचावर आणण्याचा घाट घातला गेला आहे. पाठीवर शाबासकीची थाप मारुन 'तू फक्त लढ म्हण', म्हटल्यावर केवढे चैतन्य निर्माण होतं. या घडीला ज्योतिषाचार्य शरद उपाध्ये, सदानंद चांदोरकर, शिरीष कणेकर, बंडा जोशी, जयंत ओक, दिलीप खन्ना, लालन सारंग हे एकपात्री प्रयोग करणारे कलावंत समाजातील वेगवेगळे विषय हाताळून रसिकांचं मनोरंजन करताहेत. समोरच्या प्रेक्षकांना दीड-दोन तास खिळवून ठेवण्यासाठी एकपात्री प्रयोग करणाऱ्या कलावंताला देहबोली, शब्दांवर प्रभुत्व, स्मरणशक्ती यावर प्रचंड ताबा ठेवावा लागतो. मार्मिक कोट्या आणि विनोदाचा शिडकावा या खेरीज प्रेक्षकांवर ताबा मिळवणे कठीण. एकपात्री प्रयोग करणारा कलावंत हा एक प्रकारचा कीर्तनकारच आहे. शब्द हेच भांडवल समजून प्रयोग सादर करताना त्यांना आधार असतो तो फक्त दोन घोट पाण्याचा आणि प्रेक्षकांच्या प्रतिसादाचा.

शासनाने समाजातील वाईट रुढी, परंपरा, कष्ट करण्यासाठी आणि पर्यावरणाचा प्रचार करण्यासाठी अशा एकपात्री प्रयोग करणाऱ्या कलावंतांना वेगवेगळया विषयांवर लिहिते करावे आणि त्यांनाच शासनाच्या खर्चाने सादरकर्ते करावे. नाट्यपरिषदेने त्यांना स्वतंत्र व्यासपीठ मिळवून दिले आहे. त्यांना सरकारने जनजागृतीचे आविष्कार सादर करण्यासाठी संधी द्यावी.

नाटक ही मराठी माणासाची सांस्कृतिक भूक आहे. ज्येष्ठ नाटककार राम गणेश गडकरी म्हणायचे 'की, दारु ही प्यायच्या अगोदर सुटते.' त्याच्यानंतर त्याची सुटका नाही. आमचा नाटक धंदासुध्दा असाच आहे. या धंद्यात एकदा का माणूस उतरला की मग तो तोडाला रंग लावलेला रंगकर्मी असो की नाटय व्यवस्थापक, निर्माता असो, रंगभूमीकडे त्यांची पावले वळणारच. दादासाहेब खापर्डे म्हणाले त्याप्रमाणे हा एक पवित्र धंदा आहे. मला तर पुढे जाऊन असं म्हणावंसं वाटतं की नाट्य व्यवसाय हे एक पवित्र 'व्यसन' आहे.

मी स्वतः बॅकस्टेजपासून, पंधरा रुपयाच्या नाईटपासून काम करत

आलोय. हातात कुठलीही डायरी न ठेवता दहा दहा नाटकांच्या तारखांच चोख व्यवस्थापन करणारा गोट्या सावंत, चोखंदळ विनोदी आणि आशयघन नाटक देणारा दिलीप जाधव, दिनू पेडणेकर, भालचंद्र नाईक हे एके काळचे नाट्य व्यवस्थापक माझ्यापेक्षा वयाने लहान असले तरी ते आजचे आघाडीचे निर्माते आहेत. त्यांना भेटल्यावर नाटकांविषयी बोललं जातं. तेव्हा त्यांच्या तोंडी हमखास वाक्य असतं "गवाणकरानु, नाटक धंद्याची अत्यंत वाईट परिस्थिती आहे. नको हा नाटक धंदा" पण नंतर चहाचे दोन घोट पोटात गेल्यावर ते हमखास म्हणणार. " काही नवीन असेल तर सांगा" आपण करु या ! नाटक धंदाच वाईट आहे तर मग आता नवीन कुठल्या आधारावर नाटक करुया? याला म्हणतात 'नाट्यकंडू'. ग्राम्य शब्दात बोलायचं तर ही एक खाज आहे. दारुड्या माणसाची वेळ झाली की तो जसा दारुच्या गुत्याकडे वळतो, तसा नाटकवाला माणूस झोपेतून उठल्याबरोबर एखादा कॉन्ट्रॅक्ट शो किंवा एखादी चांगली तारीख कशी काय मिळेल याचा विचार करतो. नाटकातला माणूस घोरताना सुध्दा नाटकच घोरतो. रंगभूमीला ८६ नाटके देणारे कलाभैवचे निर्माते नाटयसृष्टीतील भीष्माचार्य मोहनशेठ तोंडवळकर हे माझे ज्येष्ठ मित्र होते. शेवटचं त्यांनी सुरेश चिखलेंच 'शंभुराजे' हे नाटक केलं. तेव्हा कलावैभवाची आर्थिक परिस्थिती तेवढीशी चांगली नव्हती. तशाही परिस्थितीत ते म्हणायचे "गंगाराम, नाटकधंद्याची परिस्थिती कितीही वाईट असली तरी नाटकाशिवाय आपण जगूच शकत नाही". नाटकाच्या तालमी होऊन नाटक रंगमंचावर गेलं की मजा निघून जातो. पण नाटकाच्या तालमी सुरु असतातना एक वेगळीच मजा असते. ताळमीच्या दरम्यान नट व नट्यांनी उशिरा येणे, त्यामुळे त्यांच्यावर उसन्या रागानं भडकणे, तालीम संपल्यावर रंगकर्मींची समजूत घालणे, नाटकांवर चर्चा करणे यात खरा आनंद मिळतो.

मोहनशेठच्या तोंडून अख्खी नाटयसृष्टी बोलतेय असा भास व्हायचा आणि मग पु. ल. देशपांडेंच्या 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकात काकजींच्या तोंडी असलेले संवाद आठवायचे. काकाजी म्हणतात ...

"शिकारीची मजा धुंडण्यात आहे, शिकार मिळाली की मजा संपली".

आज या घडीला नाटक धंदा कितीही तोट्यात असला तरी वर्तमानपत्राची पानं उघडली की दोन दोन पानांवर नाटकांच्या एकापेक्षा एक देखण्या जाहिराती दिसतात. धंदा तोटयाचा मग जाहिराती कशा? यालाच म्हणतात हे खरे आहे 'नाट्यव्यसन' आणि आमचे नाट्यनिर्माते तोट्यात असूनही आनंद लुटतायत, तो नाट्य निर्मितीचा ! एकूणच नाटके उदंड आहेत !

एका महत्वाच्या बदलाचे स्वागत आज मुद्दाम करावेसे वाटते. पूर्वी नाट्यनिर्मितीची पालखी ही पुरुषच वाहून नेत होते. पण बदलत्या काळात आता पुरुषांच्या बरोबरीने अनेक महिला निर्मात्याही सक्रीय आहेत. कीर्ती शिलेदार, लता नार्वेकर यांच्या पाठोपाठच संध्या रोठे, प्रांजली मते, भाग्यश्री देसाई, मुक्ता बर्वे, कल्पना ठाकूर, अर्चना नेवरेकर, पद्मजा नलावडे, उषा झोडगे, मेधा देव या महिला नाटयनिर्मितीत अग्रेसर आहेत ही एक अभिमानाची घटना म्हणावी लागेल. नाट्यसंमेलनाध्यक्षपदही यापूर्वी गिरीजाबाई केळकर, दुर्गा खोटे, ज्योत्स्ना भोळे, डॉ. विजया मेहता, भक्ती बर्वे-इनामदार, जयमाला शिलेदार, लालन सारंग, फैय्याज या दिग्गज अभ्यासू महिलांनी भूषविले हे नाट्यसृष्टीचे भाग्य.

स्वतः तोट्यात असूनही दुसऱ्याच्या आनंदासाठी धडपडणाऱ्या नाट्यनिर्मित्यांचा शासनाने सहानुभूतीने विचार करायला हवा. सहानुभूतीने अस म्हटलं तर आमच्या निर्मात्यांना ते खपणार नाही, कारण मोडेन पण वाकणार नाही, या मराठी बाण्याचे ते आहेत. जो दुसऱ्यांना आनंद देतो त्यांना हक्काने शासनाकडे मागण्याचा अधिकार आहे आणि नाट्यसंमेलनाचा अध्यक्ष या नात्याने त्यांचाच एक प्रतिनिधी म्हणून शासनाला नाटक व्यवसायाकडे गंभीरपणे पहाण्याची वेळ आलेली आहे, हे सांगावेसे वाटते. नाटकाचा खर्च अफाट आणि दूरदर्शनच्या पडद्यामुळे प्रेक्षकांची नाटकाकडे पाठ. त्यामुळे निर्मात्यांच्या खिशाला चाट, अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे.

सांस्कृतिक खात्याचे मंत्री श्री. विनोदजी तावडे हे आमच्या कोकणातले आहेत. रंगभूमी परिनिरीक्षणाच्या अध्यक्षपदी 'श्वास फेम' अरुण नलावडेंची नेमणूक झालेली आहे आणि अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाची माळ माझ्या गळयात पडलेली आहे. तात्पर्य कोकणाला सुगीचे दिवस आलेयत असं म्हणायला हरकत नाही. असं असताना रंगभूमीवर कुठल्याही प्रकारची संकटाची सावली पडू नये असं मनापासून वाटते.

नाटकाचा खर्च कमी करायचा असेल तर सांस्कृतिक खात्याने आमच्या निर्मात्यांना नाटकाच्या तालामींना अल्पदरात परवडेल अशा जागा उपलब्ध करुन द्याव्यात. उड्डाणपुलाखालील ज्या रिकाम्या जागा आहेत तेथे नाट्य निर्मात्यांच्या गाड्या उभ्या राहण्यासाठी जागा आरक्षित ठेवावी आणि अशाच रिकाम्या जागेत नाटकांचे सेट ठेवण्यासाठी गोडावूनची व्यवस्था करावी. म्हणजे खाजगी आणि महानगरपालिका यांच्या अखत्यारित असलेल्या नाट्यगृहांची भाडी कमी करता येतील. चर्चेअंती यावर तोडगा काढावा, काही शाळांमधून शाळेच्या कारभारात व्यत्यय न आणता तेथे नाटकांच्या तालमींसाठी अल्पदरात जागा उपलब्ध करुन देता येईल का? याचा शाळांच्या संचालकांशी चर्चा करुन विचार करावा. पडद्यामागील कलावंतांच्या जागेचा प्रश्न अनेक वर्षे अनुत्तरीत आहे. म्हाडाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करुन मुंबईपासून जवळच म्हणजे पनवेलच्या आसपास एखादा भूखंड कलावंताच्या सदनिकांसाठी उपलब्ध करुन द्यावा. ज्या मराठी संस्था, शाळा वगैरे रंगभूमीविषयक उपक्रम राबवतात किंवा इतरांच्या उपक्रमात, स्पर्धेत सहभाग घेतात त्यांनाही शासनाने अनुदान द्यावे.

आता प्रश्न राहिला अध्यक्षांच्या एका वर्षाच्या कारकीर्दीचा. या एका वर्षाच्या कालावधीत नाट्य परिषदेच्या सर्वच शाखांना भेटी देऊन त्यांच्या अडीअडीचणी समजून घेतल्या जातील. त्या परिषदेच्या मध्यवर्ती कार्यालयातील पदाधिकाऱ्यांशी चर्चा करुन त्यांच्याच सहकार्याने सोडविण्याचा माझा प्रयत्न असेल. त्यासाठी केवळ परिषदेच्या शाखांना भेटी देऊनच थांबणार नाही तर

मंदिराचे विश्वस्त चंद्रकांत उर्फ अण्णा सावंत, ॲड. देवेंद्र यादव आणि अभ्यासू नाट्च समिक्षक संजय डहाळे, अरुण घाडीगांवकर या साऱ्यांच्या आग्रहामुळे आणि पाठपुराव्यामुळे अध्यक्षपदाच्या खुर्चीपर्यंत पोहोचलो. या दोस्तांच्या ऋणातच राहणे मी पसंत करेन. कारण त्यांना आभार मानणे कदापि रुचणार नाही. माझ्या यंदाच्या पंच्चाहत्तरीच्या वर्षातच नाटयसंमेलनाचा अध्यक्ष करुन द्विगुणित आनंद देण्याचा जो प्रयत्न या साऱ्यांनी केला त्याची उतराई मी कुठल्याही शब्दात करु शकणार नाही.

रंगभूमीच्या तरुण अभ्यासकांना / रंगकर्मींना, विशेषतः लेखकांना एकच मैत्रीचा सल्ला की, स्वतःचं अनुभव विश्व समृध्द होण्यासाठी त्यांनी सर्व जुन्या नाटकांचा सखोल अभ्यास करावा. विशेष करुन 'महाभारत' या महान ग्रंथाचे चिंतन मनन करावं. कारण महाभारताच्या पानापानावर शहाणपण आणि नाट्च आहे. त्यातील प्रत्येक पात्राचा प्रवास लेखकाला आव्हानात्मक आहे. नवाकाळ दैनिकाचे अग्रलेखाचे बादशहा नीलकंठ खाडीलकर यांनी लिहिलेला खाडीलकरांची नाट्यकला हा ग्रंथ अभ्यासासाठी अवश्य वाचावा.

पुरुषोत्तम दारव्हेकर यांचे 'कटयार काळजात घुसली' आणि तात्यासाहेब शिरवाडकरांच 'नटसम्राट' ही मराठी नाटकातील संगमरवरी लेणी. कुठल्याही अभिजात अभिनेत्याला आणि अभ्यासूवृत्तीच्या दिग्दर्शकांना आव्हान देणारी कथानकं आणि पात्रं नाटककरांनी या नाटकांमध्ये ठसठशीतपणे उभी केलीयेत.

आजचे आघाडीचे दिग्दर्शक महेश वामन मांजरेकर आणि सुबोध भावे यांनी या दोन नाटकांवर सिनेमे काढून या सर्व लोकांना नवीन झळाळी दिली. नाट्चसृष्टीतील हा मौल्यवान ठेवा नव्याने समोर आल्यामुळे रसिकांनी सुध्दा त्यांना उदंड प्रतिसाद दिला. एकाच वेळी तीन पिढ्यांची भूक क्षमवायची कला या कलाकृतींनी पार पाडली. आम्हांला चांगलं देण्याचा तुम्ही प्रयत्न करा आम्ही तुम्हांला भरभरुन प्रतिसाद देऊ हे रसिकांनी सिध्द करुन दाखविलं. म्हणूनच,

रसिक हेच आपले आश्रयदाते आहेत याचं भान ठेवून, त्यांच्या पुढ्यात मनोरंजनाचं सुग्रास ताट वाढण्याचा प्रयत्न करावा.

कलावंत किती सक्षम असतात याची प्रचिती अभिनेते मकरंद अनासपुरे आणि नाना पाटेकर यांनी दिली. दुष्काळग्रस्तांसाठी मदतीचा हात पुढे केल्यामुळे आम्हा मराठी कलावंताचा हा 'मराठीबाणा' बॉलीवूड कलावंतांनाही आदर्शवत ठरला. त्यांनीही मदतीचे हात पुढे केले. कलावंतांमध्ये माणूसपण जिवंत ठेवणे हा जीवनाचा फार महत्वाचा भाग आहे.

आज ठाणे नगरीत भव्य-दिव्य नाट्य संमेलनासाठी जमलेल्या सर्व नाट्यप्रेमींचे आणि ठाणेकर संयोजकांचे ९६ व्या नाटय संमेलनाचा अध्यक्ष म्हणून स्वागत आणि अभिवादन करतो. आपणाकडून माझ्या कार्यकाळात सहकार्य मिळेल अशी अपेक्षा करतो आणि भाषणाच्या समारोप प्रसंगी सर्व माजी दिग्गज नाट्यसंमेलनाध्यक्षांना वंदन करतो. त्याचप्रमाणे भावी नाट्य संमेलनाध्यक्ष यांना मन:पूर्वक शुभेच्छा व्यक्त करतो. नटराजापुढे नतमस्तक होऊन साऱ्यांचे पुन्हा एकदा आभार !

धन्यवाद !

जय हिंद ! जय महाराष्ट्र !!

**गंगाराम म. गवाणकर**

# परिचय

## श्री. गंगाराम म. गवाणकर

| | | |
|---|---|---|
| जन्मगांव | : | माडबन, ता.राजापूर, जि.रत्नागिरी |
| प्राथमिक शिक्षण | : | जन्मगावी, माडबन |
| माध्यमिक शिक्षण | : | माझगांव नाईट हायस्कूल, डोंगरी (मुंबई) |
| महाविद्यालयीन शिक्षण | : | सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई |

## व्यावसायिक रंगमंचावर आलेली नाटके

१) वेडी माणस
२) दोघी
३) वस्त्रहरण
४) प्रीतिगंध
५) मेलो डोळो मारुन गेलो
६) वन रुम किचन
७) वात्रट मेले
८) वर भेटू नका
९) वरपरिक्षा
१०) अरे बाप रे
११) महानायक
१२) पोलीस तपास चालू आहे
१३) भोळा डांबीस
१४) वडाची साल पिंपळाक
१५) भानगडीचो गाव
१६) चित्रांगंदा

वस्त्रहरण-५४०० प्रयोग,

वात्रट मेले-२५००,

वनरुम किचन-१००० प्रयोग.

१९७२ पासून आकाशवाणी व दूरदर्शनवर अनेक सदरांतून लेखन.

दहा दूरदर्शन मालिका आणि मराठी चित्रपटांचे लेखन.

१९८४ साली 'वस्त्रहरण' या मालवणी नाटकाचे ब्रिटीश रंगभूमीवर पदार्पण.

## मिळालेले पुरस्कार

- अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेतर्फे आचार्य अत्रे व गो. ब. देवल नाट्य पुरस्कार.
- अखिल भारतीय नाट्य परिषद पुरस्कृत महाराष्ट्र शासनाचा नाटककार राम गणेश गडकरी पुरस्कार.
- मुंबई मराठी साहित्य संघातर्फे प्रा. मधुकर अष्टीकर विनोदी नाटककराचा पुरस्कार.
- एकता कला मंच तर्फे 'कला गौरव' पुरस्कार.
- कोकण कला अकादमी तर्फे 'जीवन गौरव' पुरस्कार.
- अखिल भारतीय भंडारी समाजातर्फे 'साहित्य रत्नभूषण' पुरस्कार.
- २०१० साली झालेल्या कॉमनवेल्थ नाटय महोत्सवात सात नाटकांची भारतातून निवड करण्यात आली. त्यात महाराष्ट्रातून 'वस्त्रहरण' या नाटकाची निवड.
- 'व्हाया वस्त्रहरण' आत्मकथन प्रसिध्द.
- वर्तमानपत्रातून सातत्याने स्तंभ लेखन.
- झी टॉकीजचा २०१५ चा 'जीवन गौरव' पुरस्कार.
- अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, बोरीवली शाखेतर्फे 'जीवन गौरव' पुरस्कार.